प्रेसनोट

जा.क्र. ७८८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–२६/११/२०१७.

## संविधान दिवस साजरा

भंडारा :– पोलीस नियंत्रण कक्ष भंडारा येथील प्रांगणात आज दि. २६/११/२०१७ रोजी मा. पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहु यांच्या मार्गदर्शनाखाली मा. अपर पोलीस अधीक्षक,रश्मि नांदेडकर,पोलीस उपअधीक्षक (गृह) सुनिल कुलकर्णी यांच्या उपस्थितीत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून शपथ घेवुन भारताचे संविधान दिवस उद्देशिकाचे वाचन करण्यात आले.

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य घडविण्याचा व त्यांच्या सर्व नागरिकांस सामाजिक आर्थिक व राजनैतीक न्याय विचार, अभिव्यक्ती, विश्वास श्रध्दा व उपासना यांचे स्वातंत्र्य दर्जाची व संधीची समानाता निश्चीतपणे प्राप्त करुन देण्याचा आणि त्या सर्वानमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता व एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता, प्रवर्धित करण्याचा संकल्प पुर्वक निर्धार करुन आमचा संविधान सभेत आज दिंनाक २६/११/१९४९ रोजी याव्द्वारे हे संविधान अंगिकृत आणि अधिनीयीमत करुन स्वत: प्रत अपर्ण करीत आहोत.

यावेळी कार्यक्रमाला पोनी. खंडारे वायरलेस विभाग भंडारा, सपोनी. कदम पोलीस कल्याण विभाग भंडारा, सपोनि रायपुरे नियत्रंण कक्ष अधीकारी, पोउपनी देशमुख बी. डी. डी. एस भंडारा, पोलीस मुख्यालय राखीव पोलीस निरीक्षक वर्मा, पोलीस उपनिरीक्षक प्रधान, पोलीस शाखेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.


(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५


प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.